दैनिक
अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | शनिवार, 7 नोव्हेंबर 2026 | अंक क्र. 173 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

अंबाजोगाई पोलिसांचा दणका! कर्णकर्कश आवाज करणाऱ्या ८० हून अधिक सायलेंसरचा रोलरखाली चुराडा;

पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांचा धडाकेबाज उपक्रम!

■ अंबाजोगाई अशोक दळवे

अंबाजोगाई शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच नागरिकांना शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरण मिळावे, यासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. शहरात दुचाकींना मोठ्या आवाजाचे कर्णकर्कश सायलेंसर बसवून गल्ली-बोळांतून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या वाहनधारकांविरोधात पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी धडक मोहीम हाती घेतली. या मोहिमेत जप्त करण्यात आलेल्या ८० हून अधिक बेकायदेशीर सायलेंसरचा चक्क रोड रोलरखाली चुराडा करण्यात आला. दिवाळीच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा अनोखा आणि लक्षवेधी उपक्रम राबविण्यात आला. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचा पदभार पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी स्वीकारल्यापासून शहरातील वाहतूक व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था आणि सार्वजनिक शांतता अबाधित राखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली शहर पोलिसांनी शिस्तभंग करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील काही दुचाकीस्वार आपल्या वाहनांना मोठ्या आवाजाचे सायलेंसर बसवून भरधाव वेगाने गल्लोगल्ली फिरत होते. या वाहनांमधून निघणाऱ्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती, महिला, लहान मुले तसेच रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः रात्रीच्या वेळी या आवाजामुळे नागरिकांच्या शांततेचा भंग होत होता. या प्रकाराला आळा घालण्यासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांनी विशेष मोहीम राबवून ८० हून अधिक मोठ्या आवाजाचे सायलेंसर जप्त केले.



दिवाळीच्या मुहूर्तावर सायलेंसरचा कायमचा बंदोबस्त!

जप्त केलेल्या या सायलेंसरचे काय केले जाणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले होते. अखेर दिवाळीच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिवाजी महाराज चौक या सार्वजनिक ठिकाणी पोलिसांनी रोड रोलरच्या साहाय्याने या सायलेंसरचा अक्षरशः चुराडा केला. कर्णकर्कश आवाज करणाऱ्या सायलेंसरविरोधात केलेली ही प्रतीकात्मक कठोर कारवाई शहरात चर्चेचा विषय ठरली आहे.

पोलिसांच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत!

ध्वनीप्रदूषण हा केवळ त्रासदायक प्रकार नसून नागरिकांच्या आरोग्याशी आणि सार्वजनिक शांततेशी निगडित गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे अंबाजोगाईकरांनी स्वागत केले असून, शहरात शांतता आणि शिस्त राखण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू ठेवाव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. मोठा आवाज करून शहरातील शांतता भंग करणाऱ्यांनो सावधान! अंबाजोगाई पोलिसांचा इशारा आता केवळ कारवाईपुरता मर्यादित नसून, थेट सायलेंसरच्या चुराड्यापर्यंत पोहोचला आहे!


दिवाळीच्या अनुषंगाने नगरपरिषदेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन आणि महागाई भत्ता अदा !

नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या पुढाकारातून कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी

ना पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगर परिषदेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन दिवाळीपूर्वीच अदा करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पदभार स्वीकारल्यापासून कंत्राटीसह सर्वच कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्यावर भर दिलेला असून दिवाळीच्या अनुषंगानेही दिवाळीपूर्वीच हातात पैसे यावे या दृष्टिकोनातून वेतनाची रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्याचे ३२ लाख ३४ हजार रुपये वेतन अदा करण्यात आले आहे. तसेच वसुली, अग्निशमन आणि विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचेही वेतन दिवाळीपूर्वीच देण्यात आले आहे. यामध्ये वसुली विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ३८ हजार ७६८ रुपये, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ८७ हजार ५७२ रुपये आणि विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ६८ हजार ८६३ रुपये वेतन,



पाणीपुरवठा ५ लक्ष ७६ हजार ८२८ रुपये, जेसीबी ऑपरेटर ४७००० रुपये वेतन अदा करण्यात आले आहे.तसेच नागरी उपजीविका अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे १ लाख ३४ हजार ४०० रुपये वेतनही अदा करण्यात आले आहे.सर्वच कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दिवाळीच्या सणापूर्वीच वेतन मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांना सणाचा आनंद साजरा करण्यासाठी आर्थिक मदत झाली आहे. नगरपरिषदेच्या या निर्णयाचे कर्मचारी वर्गातून स्वागत होत आहे. या बद्दल सर्वच कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, स्वच्छता सभापती सौ. प्राजक्ताताई कराड, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते, महिला व बालकल्याण सभापती अंजलीताई माळी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, सर्व नगरसेवक, नगरसेविका यांचे आभार व्यक्त केले आहेत.

नगरपरिषदेवर नवीन नियमक मंडळ आल्यापासून वेतन नियमितच!

परळी वैजनाथ शहराची मध्यवर्ती संस्था असलेल्या नगर परिषदेचे कामकाज हे संपूर्ण समन्वयातून चालवण्याचा प्रयत्न नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली नवीन नियमक मंडळांनी केलेला आहे. शहर विकासाच्या अथक प्रयत्नांबरोबरच प्रशासकीय कामकाजातील सुसूत्रता, नियमितता, पारदर्शकता, सेवा सुविधा, कामकाजात सुलभता आणण्यासाठीही सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. परळी नगर परिषदेवर नवीन नियमक मंडळ आल्यानंतर व नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पदभार घेतल्यापासून आजतागायत कर्मचारी वेतन, दैनंदिन खर्च तजवीज , कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन हे नियमितच आहे. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी १३ मे २०२५ रोजी पदभार स्वीकारल्यानंतर १२ मे २०२६ पर्यंतच्या कालावधीतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ४ कोटी २ लाख रुपये वेतन अदा करण्यात आले. तसेच १३ मे ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील १ कोटी ८५ लाख २२ हजार ५८० रुपये वेतन देण्यात आले आहे. नगरपरिषदेकडून केवळ कंत्राटीच नव्हे, तर कायमस्वरूपी कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि इतर विभागांतील कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनालाही सातत्याने प्राधान्य देण्यात आलेले आहे.

याशिवाय, परळी नगरपरिषदेतील कायमस्वरूपी कार्यरत कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही दिवाळीपूर्वी मोठा दिलासा देण्यात आला आहे. या दोन्ही कर्मचारी वर्गाचे ऑक्टोबर २०२६ महिन्याचे वेतन अदा करण्यात आले असून, कर्मचाऱ्यांची प्रलंबित असलेली २४ लाख रुपयांची महागाई भत्त्याची थकबाकीही प्रदान करण्यात आली आहे.

हृदयद्रावक ! इगतपुरीतील मुकणे धरणात दोघे पोहण्यासाठी गेले अन्...दिवाळीच्या आनंदावर विरजण

■ इगतपुरी : वृत्तसंस्था

दिवसभर शोधमोहीम, मात्र दोघेही बेपत्ता

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. मुकणे धरणात पोहण्यासाठी गेलेले दोन जण बेपत्ता झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अनिल भागुजी भदादे (वय 49) आणि तुकाराम दामू येले (वय 47) अशी बेपत्ता व्यक्तींची नावे आहेत. गुरुवारी दुपारपासून दोघांचा शोध सुरू असून, शुक्रवारी दिवसभर शोधमोहीम राबवूनही त्यांचा ठावठिकाणा लागलेला नाही. या घटनेमुळे सांजेगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

पोहण्यासाठी गेले अन् परतलेच नाहीत

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी अनिल भदादे आणि तुकाराम येले हे दोघे मुकणे धरण परिसरात पोहण्यासाठी गेले होते. मात्र, बराच वेळ उलटूनही ते घरी परतले नाहीत. त्यामुळे चिंतेत पडलेल्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. यादरम्यान धरणाच्या काठावर दोघांचे कपडे आणि काही वैयक्तिक वस्तू आढळून आल्या. त्यामुळे दोघेही धरणाच्या पाण्यात बुडाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. या घटनेची माहिती तातडीने वाडीवऱ्हे पोलिसांना देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच आमदार हिरामन खोसकर यांनी मुकणे धरण परिसरात धाव घेतली. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून सुरू असलेल्या शोधमोहिमेचा आढावा घेतला. तसेच संबंधित यंत्रणांना शोधकार्य वेगाने करण्याच्या सूचना दिल्या. स्थानिक नागरिक, पोलीस कर्मचारी आणि अनुभवी पाणबुड्यांच्या मदतीने धरणाच्या पाण्यात दोघांचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले.

■ शुक्रवारी सकाळपासून पाणबुड्यांनी धरणाच्या पाण्यात शोधमोहीम सुरू केली होती. दिवसभर अथक प्रयत्न करूनही दोघांचा शोध लागला नाही. सायंकाळी उशिरापर्यंत शोधकार्य सुरू ठेवण्यात आले. मात्र, अंधार पडल्याने सुरक्षेच्या कारणास्तव शोधमोहीम थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. दोघेही अद्याप बेपत्ता असल्याने त्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढली आहे. परिसरातील नागरिकही शोधकार्याकडे लक्ष ठेवून आहेत. दिवाळीच्या आनंदावर विरजण

■ दिवाळीसारख्या आनंदाच्या सणाच्या काळात ही दुर्दैवी घटना घडल्याने सांजेगाव परिसरात शोककळा पसरली आहे. दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, बेपत्ता व्यक्तींचा लवकरात लवकर शोध लागावा, अशी प्रार्थना नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, दोघांचा शोध घेण्यासाठी पुढील शोधमोहीम सुरू ठेवण्याचे प्रयत्न आहेत.

संपादकीय

युद्धात भारताची होरपळ

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्रायल-इराण संघर्षाचा फटका भारतातील सामान्य नागरिकांना बसत असून पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीचे दरही सातत्याने वाढत आहेत. इंधन दरवाढीमुळे सामान्य माणसाचा घरखर्च कोलमडत चालला आहे. युद्ध लांबत गेले तर भारतासारख्या इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोरील आर्थिक संकट आणखी भीषण होण्याची शक्यता आहे.

अमेरिका, इस्त्रायल, इराण युद्धामुळे इंधनाची सातत्याने दरवाढ होत आहे. पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीच्या दरातही १० दिवसांमध्ये चौथ्यांदा वाढ झाली आहे. इंधनात दरवाढ झाली की, महागाई आपोआप वाढते. महागाईवर नियंत्रण ठेवणे कोणालाच शक्य नाही. युद्धबंदीच्या चर्चा होतात, पुन्हा हल्ले होतात. यामुळे इंधनासाठी अवलंबून असलेले भारतासारखे देश होरपळून चालले आहेत. तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याची वेळ या देशांवर आली आहे. युद्धाबाबत अमेरिका व इराण कोणीही लवचिक भूमिका घेत नसल्याने युद्ध लांबण्याची शक्यता आहे. जगात कुठेही युद्ध पेटले की त्याची राख सर्वप्रथम सामान्य माणसाच्या चुलीवर पडते. आज नेमके तेच घडत आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षाने संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या खाईत ढकलले आहे. युद्धाच्या बातम्या टीव्हीवर दिसतात, क्षेपणास्त्रांचे आवाज मध्यपूर्वेत घुमतात; पण त्याचे भारतासारख्या विकसनशील देशांना चटके बसतात. कारण युद्ध जिथे होते, तिथे फक्त बॉम्ब पडत नाहीत, तर त्यासोबत जागतिक अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडते. तेलाच्या किमती उसळतात, डॉलर मजबूत होतो, आयात खर्च वाढतो आणि त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांच्या खिशाला बसतो. भारत आजही मोठ्या प्रमाणावर इंधनासाठी परदेशांवर अवलंबून आहे. कच्च्या तेलाची आयात थांबली किंवा दर वाढले की संपूर्ण अर्थचक्र हादरते. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीनंतर आता सीएनजीचे दरही दहा दिवसांत चौथ्यांदा वाढले आहेत. ही केवळ आकड्यांची वाढ नाही, तर ती सामान्य नागरिकांच्या जगण्यावर चाललेली आर्थिक चढाई आहे. रोज सकाळी पेट्रोल पंपावर दर बदलतात आणि त्याच वेगाने बाजारातील वस्तूंचे भाव वाढतात. भाजीपाला, दूध, धान्य, बांधकाम साहित्य, वाहतूक, औद्योगिक उत्पादन या सर्वच क्षेत्रांवर या इंधन दरवाढीचा परिणाम होतो.

महागाई ही केवळ आर्थिक संज्ञा नाही; ती गरिबाच्या थाळीतून कमी होणारी भाकरी आहे. जेव्हा इंधन महाग होते, तेव्हा ट्रकचे भाडे वाढते, वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा भार शेवटी ग्राहकावर टाकला जातो. त्यामुळे महागाई नियंत्रणाबाहेर जाते. सरकार कितीही आश्वासने देत असले, तरी वास्तव असे आहे की, इंधन दरवाढ झाली की महागाईला लगाम घालणे जवळपास अशक्य बनते. आज भारतातील मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग अक्षरशः तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत आहे. पगार वाढत नाहीत, रोजगाराची स्थिती स्थिर नाही, पण खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांमध्ये कामावर जाणाऱ्या सामान्य कर्मचाऱ्यापासून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यापर्यंत प्रत्येकजण या महागाईच्या आगीत भाजत आहे. या सर्व परिस्थितीमागे मध्यपूर्वेतील युद्धजन्य वातावरण मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणविरोधात घेतलेली आक्रमक भूमिका आणि त्याला इराणकडून मिळणारे प्रत्युत्तर यामुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे. युद्धबंदीच्या चर्चा होतात, शांततेच्या घोषणा केल्या जातात; पण दुसऱ्याच दिवशी पुन्हा हल्ले सुरू होतात. यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होते. तेल उत्पादक प्रदेशात तणाव वाढला की कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत भीती निर्माण होते आणि लगेच आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर वाढतात. अमेरिकेला तिची महासत्ता टिकवायची आहे, इस्त्रायलला स्वतःची सुरक्षा सिद्ध करायची आहे आणि इराणला झुकायचे नाही. या तीन शक्तींच्या अहंकाराच्या संघर्षात भारतासारख्या देशांची आर्थिक कोंडी होत आहे. युद्धात सहभागी नसतानाही भारताला त्याची किंमत मोजावी लागत आहे. कारण भारताकडे तेलाचे प्रचंड साठे नाहीत. देशाला ऊर्जा हवी असेल, उद्योग चालवायचे असतील, वाहतूक सुरळीत ठेवायची असेल तर आयात केलेल्या तेलावर अवलंबून राहावेच लागते.

युद्ध जितके लांबेल, तितका भारतावरचा आर्थिक दबाव वाढणार आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाला की, आयात अधिक महाग होते. सरकार कर कमी करून नागरिकांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न करू शकते; पण त्यालाही मर्यादा आहेत. कारण सरकारलाही महसूल हवा असतो. परिणामी सामान्य नागरिक दोन्हींकडून भरडला जातो, एकीकडे महाग इंधन आणि दुसरीकडे वाढती महागाई. आज परिस्थिती इतकी गंभीर बनली आहे की, लोकांच्या आर्थिक नियोजनाचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. सीएनजी दरवाढीचा सर्वात मोठा फटका रिक्षाचालक, टॅक्सीचालक आणि छोट्या वाहतूक व्यावसायिकांना बसत आहे. त्यांचे उत्पन्न वाढत नाही; पण खर्च मात्र प्रचंड वाढतो आहे. शेवटी तेही भाडेवाढ करतात आणि त्याचा भार पुन्हा सामान्य माणसालाच सहन करावा लागतो. सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे या संकटावर कोणाकडेही ठोस उपाय दिसत नाही. युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निष्प्रभ ठरत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठका होतात, निवेदने दिली जातात; पण प्रत्यक्षात युद्धबंदी घडताना दिसत नाही. अमेरिका आणि इराण दोघेही माघार घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. इस्त्रायलची भूमिका देखील अधिक आक्रमक होत चालली आहे. त्यामुळे हा संघर्ष दीर्घकाळ सुरू राहण्याची भीती वाढत आहे. भारताने आता या परिस्थितीकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहून चालणार नाही. दीर्घकालीन ऊर्जा धोरण अधिक मजबूत करावे लागेल. पर्यायी ऊर्जा स्रोत, इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार, सौरऊर्जा, जैवइंधन आणि स्थानिक ऊर्जा उत्पादन यावर आक्रमक गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक आंतरराष्ट्रीय युद्धानंतर भारताला अशाच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागेल. जगातील महासत्ता आपापल्या राजकीय आणि सामरिक स्वार्थासाठी संघर्ष करत राहतील; पण त्याची किंमत भारतातील सामान्य माणूस रोज पेट्रोल पंपावर, बाजारात आणि घरखर्चात चुकवत राहणार आहे. हे युद्ध फक्त मध्यपूर्वेत सुरू नाही, तर ते भारतातील प्रत्येक घराच्या अर्थसंकल्पावर चालले आहे. इंधन दरवाढ आणि महागाईच्या रूपाने सामान्य नागरिक रोज या युद्धाचे घाव सहन करत आहे आणि जर अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांनी आपली आक्रमक भूमिका बदलली नाही, तर येणारे दिवस आणखी भयावह ठरू शकतात.

अंबाजोगाईचे डॉ.कमलाकर राऊत यांना 'भारत काव्यरत्न राष्ट्रीय सम्मान' पुरस्कार

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)



येथील श्री योगेश्वरी नूतन विद्यालय माध्यमिक विभागातील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक, साहित्यिक, वक्ते, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते व प्रबोधनकार डॉ.कमलाकर कोंडिबा राऊत यांना डोंबिवलीच्या इन्कलाब पब्लिकेशनने राष्ट्रीय स्तरावरील भारत काव्यरत्न राष्ट्रीय सम्मान पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

काव्यग्रंथ, पदक आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. इन्कलाब पब्लिकेशनचे प्रकाशक रमाकांत यादव यांनी देशभरातून देशभक्तीपर हिंदी कविता मागविल्या होत्या.त्यांतील निवडक कवींच्या रचनांचा परिचय व फोटोसह समावेश भारत का अभिमान: तिरंगा देशभक्ती प्रातिनिधिक काव्यसंग्रहात करण्यात आला आहे. त्यांत डॉ.राऊत यांच्या स्वाधीनता दी हैं तुम्हें, भारतीय हैं संस्कृति, सुखी विश्व चाहती हैं, या रचनांचा समावेश केला आहे. डॉ.राऊत यांच्याबाबत परिचयात संपादक डॉ. पंकज पालीवाल यांनी लिहिले आहे, महाराष्ट्र की समृद्ध सामाजिक, सांस्कृतिक और साहित्यिक पृष्ठभूमि से जुडे डॉ.राऊत अपने क्षेत्र और परिवेश के साथ आत्मीय संबंध रखते हैं | उनके नाम के साथ डॉक्टर उपाधि उनके शैक्षणिक एवं बौद्धिक व्यक्तित्व की ओर संकेत करती हैं| अंबाजोगाई क्षेत्र से जुडाव उनके स्थानीय परिवेश, समाज और संस्कृति के प्रति उनकी आत्मियता को दर्शाता हैं | सरलता, सामाजिक जुडाव और अपने कार्य के प्रति सक्रियता उनके व्यक्तित्व के प्रमुख पक्ष माने जा सकते हैं | या शब्दांत राऊत यांचा त्यांनी गौरव केला आहे. कामगार ते शिक्षक,शिक्षक ते राष्ट्रपती पुरस्कार असा राऊत यांचा प्रवास घडला आहे. राऊत यांनी सुरुवातीला आय.टी.आय. फिटरच्या आधारे धूत कॉम्पॅक व बजाज कंपनीत कामगार म्हणून कार्य केले. एच.एस.सी.,डी.एड. या शैक्षणिक अर्हतेवर श्री योगेश्वरी नूतन विद्यालय मंदिर विभागात १९९७ साली त्यांनी सेवेला प्रारंभ करताच पुढे सलग बहि:स्थ शिक्षण घेऊन साहित्यभूषण, बी.ए.,एम.ए.,बी,एड., एम.एड.,नेट,पीएच.डी., डी.एस.एम.,एन.डी. - २, एल.टी.सी, राष्ट्रभाषा प्रवीण,राष्ट्रभाषा पंडित, सी.टी.ई.टी.ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे. डॉ.राऊत यांनी असंख्य नीतिसंपन्न विद्यार्थी घडविले असून असंख्य गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना मदत केली आहे. त्यांनी आत्मबांधवांचे प्राण वाचविण्यासाठी स्वयंस्फूर्त पणे २० वेळेस रक्तदान केले आहे. त्यांनी विविध व्याख्यानांतून, लेखनांतून हजारो व्यक्ती निर्व्यसनी, शाकाहारी व सत्प्रवृत्त केल्या असून असंख्य रक्तदाते, लेखक, सामजिक कार्यकर्ते घडविले आहेत. डॉ.राऊत यांची ३ पुस्तके, संपादित २ पुस्तके व विविध विशेषांक, स्मरणिका, ४८ शोधनिबंध आणि ५०० पेक्षा अधिक लेख, कविता, कथा आजपावेतो प्रकाशित झाल्या आहेत. डॉ.राऊत यांना लेखनासाठी याआधी विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके आणि विविध क्षेत्रांतील कर्तृत्वासाठी राष्ट्रपती पुरस्कारासह विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सदरील राष्ट्रीय पुरस्काराबद्दल डॉ.राऊत यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, मी श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाचा विद्यार्थी राहिलो असून याच विद्यालयात अध्यापन करीत आलो आहे,याचा मला सार्थ अभिमान वाटत आला आहे. शिक्षकाची भूमिका ही स्वाभाविक चैतन्यशील व चैतन्यदायी असून दैनंदिन परिणामकारक व स्फूर्तिदायी अध्यापनासाठी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध पदवी परीक्षांच्या अभ्यासाचा, उच्च शिक्षणाचा खूप उपयोग झाला आहे. अध्यापन आणि लेखन हे माझे श्वास आहेत. विद्यार्थ्यांची, रसिकांची माझ्या मराठी, हिंदी कवितांना देशभर दाद मिळत गेली. अधिक दर्जेदार, उत्कट लिहित गेलो. त्यामुळे हा मोठा सन्मान मला मिळाला आहे. सदरील पुरस्कारासाठी डॉ.राऊत यांचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर, सर्व सन्माननीय संचालक, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती ए.आर. पाठक, उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, पर्यवेक्षक रवी मठपती, विष्णू राऊत, सहकारी शिक्षक, विद्यार्थी, कवी व चाहत्यांनी अभिनंदन केले आहे.

दिवाळीच्या परंपरा आणि आधुनिक स्त्री : डॉ. सुवर्णा कराड

दिवाळी हा भारतीय संस्कृतीतील आनंद, प्रकाश, मांगल्य आणि समृद्धीचा उत्सव आहे. या सणाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व असण्याबरोबरच कौटुंबिक आणि सामाजिक जीवनातही विशेष स्थान आहे. दिवाळीच्या परंपरा जतन करण्यात भारतीय स्त्रियांचे योगदान ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. घराची स्वच्छता, सजावट, रांगोळी, फराळाची तयारी, धार्मिक विधी, पाहुणचार आणि कुटुंबातील नातेसंबंध जपणे या सर्व गोष्टींमध्ये स्त्रीची भूमिका केंद्रस्थानी राहिली आहे. मात्र, काळानुसार स्त्रीच्या भूमिकेत बदल झाला असून पारंपरिक जबाबदाऱ्या सांभाळणारी स्त्री आज आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे नेतृत्वही करीत आहे.



पूर्वीच्या काळात दिवाळीची चाहूल लागली की घरातील महिलांची लगबग सुरू होत असे. घराची स्वच्छता, रंगरंगोटी, धान्य आणि किराणा साहित्याची खरेदी, फराळाचे पदार्थ तयार करणे, रांगोळी काढणे, पणत्या सजवणे आणि धार्मिक विधींची तयारी अशा अनेक कामांची जबाबदारी महिलांवर असे. चकली, चिवडा, करंजी, लाडू, शंकरपाळे, अनारसे असे पारंपरिक पदार्थ तयार करण्यासाठी महिला अनेक दिवस आधीपासून तयारी करत असत. घरातील आजी, आई, मुली आणि सुना एकत्र येऊन फराळ तयार करीत असत. या प्रक्रियेतून केवळ खाद्यसंस्कृतीचे जतन होत नसे, तर पिढ्यांमधील संवाद, सहकार्य आणि कौटुंबिक जिव्हाळाही वाढत असे. दिवाळीच्या निमित्ताने माहेर-सासरची नाती, शेजारधर्म आणि मैत्रीचे बंध अधिक दृढ होत असत.

या पारंपरिक व्यवस्थेत महिलांचे श्रम मोठ्या प्रमाणात गुंतलेले असले, तरी त्यांची दखल नेहमीच पुरेशा प्रमाणात घेतली जात नव्हती. दिवाळी हा सर्वांच्या आनंदाचा सण असला, तरी तो आनंद निर्माण करण्यासाठी महिलांना अनेकदा स्वतःच्या विश्रांतीचा आणि वैयक्तिक आवडीचा त्याग करावा लागत असे. घरातील प्रत्येकासाठी नवीन कपडे, आवडीचे पदार्थ आणि आनंदाचे वातावरण निर्माण करताना स्वतःच्या आनंदाला दुय्यम स्थान देण्याची प्रवृत्तीही दिसून येत असे. ही परिस्थिती आज बदलण्याची गरज समाजाने अधिक गांभीर्याने ओळखली आहे.

आजची स्त्री शिक्षित, आत्मनिर्भर आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. ती गृहिणी असो, नोकरदार असो, उद्योजिका असो किंवा प्रशासन, शिक्षण, विज्ञान, कला आणि संशोधन क्षेत्रात कार्यरत असो, प्रत्येक क्षेत्रात तिने स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे दिवाळीकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोनही बदलला आहे. आज ती परंपरा जपत असतानाच आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत बदल स्वीकारत आहे. घराची सजावट आणि फराळाची तयारी ही केवळ तिचीच जबाबदारी नसून कुटुंबातील सर्व सदस्यांनी ती सामायिकपणे पार पाडावी, अशी अपेक्षा वाढत आहे. पुरुषांनी घरकामात सहभागी होणे, मुलांनी स्वच्छता आणि सजावटीत मदत करणे आणि प्रत्येकाने सणाच्या तयारीत योगदान देणे ही आधुनिक कुटुंबव्यवस्थेची सकारात्मक दिशा आहे.

दिवाळीने महिलांसाठी आर्थिक स्वावलंबनाच्या नव्या संधीही निर्माण केल्या आहेत. महिला बचतगट, गृहउद्योग आणि लघुउद्योगांच्या माध्यमातून हजारो महिला फराळाचे पदार्थ, आकाशकंदील, मातीच्या पणत्या, तोरणे, सजावटीच्या वस्तू आणि भेटवस्तू तयार करून त्यांची विक्री करतात. डिजिटल तंत्रज्ञान आणि ऑनलाइन बाजारपेठेमुळे त्यांना आपल्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. अनेक महिला दिवाळीच्या काळात स्वतःचा व्यवसाय वाढवतात, रोजगार निर्माण करतात आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतात. त्यामुळे दिवाळी हा केवळ धार्मिक उत्सव न राहता महिला उद्योजकतेला चालना देणारा आर्थिक उपक्रमही ठरत आहे.

आधुनिक स्त्री दिवाळीच्या परंपरांकडे विवेकपूर्ण दृष्टिकोनातून पाहते. लक्ष्मीपूजन, भाऊबीज, पाडवा आणि इतर धार्मिक विधींचे सांस्कृतिक महत्त्व ती जाणते; परंतु कोणतीही परंपरा केवळ रूढी म्हणून स्वीकारण्याऐवजी तिच्यामागील विचार समजून घेण्याचा प्रयत्न करते. श्रद्धा ही वैयक्तिक बाब असली, तरी अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा आणि स्त्री-पुरुषांमधील भेदभाव यांना परंपरेच्या नावाखाली प्रोत्साहन दिले जाऊ नये, अशी तिची भूमिका आहे. परंपरेतील चांगल्या गोष्टी जतन करणे आणि कालबाह्य गोष्टींमध्ये आवश्यक बदल करणे हा आधुनिक विचारांचा महत्त्वाचा भाग आहे.

दिवाळीच्या निमित्ताने महिलांच्या आरोग्याचा, सुरक्षिततेचा आणि वैयक्तिक आनंदाचाही विचार होणे आवश्यक आहे. घरातील सर्वांसाठी काम करणाऱ्या महिलेला स्वतःसाठी वेळ मिळाला पाहिजे. सणाच्या तयारीत तिच्यावर अतिरिक्त कामाचा भार पडण्याऐवजी कुटुंबातील प्रत्येक सदस्याने जबाबदारी वाटून घेतली पाहिजे. स्त्रीचा सन्मान केवळ लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करण्यापेक्षा तिच्या कष्टांचा, निर्णयस्वातंत्र्याचा, विचारांचा आणि कर्तृत्वाचा वर्षभर आदर केला पाहिजे. घरातील मुला-मुलींना समानतेचे संस्कार देण्याची हीदेखील महत्त्वाची संधी आहे.

आधुनिक स्त्री पर्यावरणपूरक दिवाळीचा विचारही करते. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण कमी करणे, स्थानिक कारागिरांकडून पणत्या आणि सजावटीच्या वस्तू खरेदी करणे, अन्नाची नासाडी टाळणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे अशा उपक्रमांत तिचा सहभाग वाढत आहे. महिला बचतगटांच्या उत्पादनांना प्राधान्य देणे, अनाथ मुले, वृद्ध आणि वंचित कुटुंबांसोबत सणाचा आनंद वाटून घेणे यामुळे दिवाळीला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप प्राप्त होते. आजच्या आधुनिक स्त्रीसमोर घर, नोकरी, व्यवसाय, मुलांचे संगोपन आणि सामाजिक जबाबदाऱ्या अशा अनेक आघाड्या आहेत. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना तिच्या श्रमांचे योग्य मूल्यमापन होणे आणि कुटुंबाने तिला सहकार्य करणे आवश्यक आहे. स्त्री सक्षमीकरणाची सुरुवात घरातूनच होते. घरातील निर्णयप्रक्रियेत तिला समान स्थान देणे, तिच्या आवडी-निवडींचा आदर करणे आणि तिच्या प्रगतीसाठी संधी उपलब्ध करून देणे हीच तिच्याविषयीची खरी कृतज्ञता ठरेल.

शेवटी, दिवाळीच्या परंपरा आणि आधुनिक स्त्री यांचा संबंध हा केवळ सण साजरा करण्यापुरता मर्यादित नाही. भारतीय संस्कृतीचा वारसा जपत नव्या सामाजिक मूल्यांची निर्मिती करण्याची क्षमता आधुनिक स्त्रीमध्ये आहे. पूर्वी ती दिवाळीचा आनंद निर्माण करण्यासाठी प्रामुख्याने घराच्या चौकटीत कार्यरत होती; आज ती घराबरोबरच समाज, अर्थव्यवस्था आणि विविध क्षेत्रांमध्येही परिवर्तन घडवत आहे. तिचे योगदान केवळ परंपरा जपण्यापुरते न पाहता तिच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा आणि कर्तृत्वाचा सन्मान झाला पाहिजे. दिवाळीत देवी लक्ष्मीची पूजा करणे ही श्रद्धा आहे; परंतु घरातील आणि समाजातील प्रत्येक स्त्रीच्या श्रमांचा, स्वातंत्र्याचा, आत्मसन्मानाचा आणि कर्तृत्वाचा आदर करणे हे खऱ्या अर्थाने समृद्ध समाजाचे लक्षण आहे. दिव्यांचा प्रकाश घर उजळवतो, पण स्त्रीला समानता आणि सन्मान दिला तर संपूर्ण समाजाचे भविष्य उजळते.

■ **डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र.**

गाईच्या खुराकाचे दर गगनाला भिडले; भुसा, गुळीपेंड व पत्रीपेंडचे भाव कमी करण्याची दूध उत्पादक शेतकऱ्यांची मागणी!

■ प्रतिनिधी - सोपान पगारे

आधीच दुष्काळा चे संकट चारा-पाण्याची टंचाई; वाढत्या खुराकाच्या दरामुळे पशुपालक शेतकरी आर्थिक संकटात!



सध्या शेती व्यवसायाला जोडधंदा म्हणून मोठ्या प्रमाणावर केला जाणारा दुग्ध व्यवसाय वाढत्या खर्चामुळे अडचणीत सापडला आहे. गाई-म्हशींच्या खुराकाचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडू लागले आहे. भुसा, गोळीपेंड, पत्रीपेंड यांसह जनावरांच्या खाद्याचे दर गगनाला भिडल्याने पशुपालक शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, यंदा आधीच दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांसमोर जनावरांच्या चारा आणि पाण्याचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. शेतात हिरवा चारा उपलब्ध नाही, वाळलेल्या चाऱ्याची टंचाई जाणवत आहे, तर अनेक ठिकाणी जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचीही वानवा आहे. अशा परिस्थितीत जनावरांचे संगोपन करणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. एकीकडे चारा-पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, तर दुसरीकडे खुराकाचे वाढते दर शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लावत आहेत.

दुधाच्या उत्पादनासाठी जनावरांना नियमित पौष्टिक खाद्य देणे आवश्यक असते. मात्र, भुसा, गोळीपेंड, पत्रीपेंड यांचे वाढलेले दर पाहता जनावरांचे संगोपन करणे दिवसेंदिवस महागडे ठरत आहे. एका बाजूला जनावरांच्या चाऱ्याचा आणि खुराकाचा खर्च वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला दुधाला मिळणारा दर आणि उत्पादन खर्च यांचा ताळमेळ बसत नसल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत.

दुध व्यवसाय हा ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार आहे. शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकऱ्यांनी गाई-म्हशींचे पालन केले आहे. मात्र, दुष्काळ, चारा-पाण्याची टंचाई, वाढते पशुखाद्याचे दर आणि इतर खर्च यामुळे हा व्यवसाय परवडेनासा झाला आहे. परिणामी, काही शेतकरी नाइलाजाने जनावरांची संख्या कमी करण्याचा विचार करीत आहेत.

आधीच पावसाअभावी शेतीचे आर्थिक गणित बिघडलेले असताना आता जनावरांचा सांभाळ करणेही कठीण झाले आहे. जनावरांना जगवायचे कसे, चारा आणि पाण्याची व्यवस्था कुठून करायची आणि वाढत्या खुराकाचा खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न पशुपालक शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. शासनाने दुष्काळी परिस्थितीचा विचार करून जनावरांसाठी चारा छावण्या, पाणीपुरवठा आणि पशुखाद्याच्या दराबाबत ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

त्यामुळे शासनाने तसेच पशुखाद्य उत्पादक कंपन्या आणि विक्रेत्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. भुसा, गोळीपेंड, पत्रीपेंड यांचे दर कमी करून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी व दूध उत्पादकांकडून जोर धरू लागली आहे.

दुधाचे उत्पादन टिकवायचे असेल तर जनावरांच्या खुराकाचे दर नियंत्रणात आणणे आणि दुष्काळी परिस्थितीत चारा-पाण्याची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा वाढत्या खर्चामुळे ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसाय अडचणीत येऊन शेतकऱ्यांना हा जोडधंदा सोडण्याची वेळ येऊ शकते

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

विद्यार्थी दिन : शिक्षण, समता आणि प्रबुद्ध समाजनिर्मितीचा संकल्प : डॉ. राजेंद्र बगाटे

दरवर्षी ७ नोव्हेंबर हा दिवस महाराष्ट्रात 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ विद्यार्थ्यांच्या आनंदाचा, उत्साहाचा किंवा शैक्षणिक उपक्रमांचा दिवस नसून शिक्षणाचे महत्त्व, ज्ञानाची शक्ती, सामाजिक समता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे सर्वांत प्रभावी साधन आहे. माणसाला विचार करण्याची क्षमता, योग्य-अयोग्य यांतील फरक ओळखण्याची समज, स्वतःचे अधिकार जाणून घेण्याचे भान आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य शिक्षणातून प्राप्त होते. त्यामुळे विद्यार्थी दिन हा प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या शैक्षणिक जबाबदारीची जाणीव करून देण्याबरोबरच समाजाच्या सर्वांगीण विकासात शिक्षणाची भूमिका अधोरेखित करणारा दिवस आहे.

७ नोव्हेंबर या दिवसाला महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक इतिहासात विशेष महत्त्व आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूलमध्ये शाळेत प्रवेश घेतला होता. त्यांच्या शैक्षणिक जीवनातील या महत्त्वपूर्ण घटनेच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासाकडे पाहिले असता शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष, प्रतिकूल परिस्थितीतही ज्ञानप्राप्तीची जपलेली जिद्द आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविण्याची त्यांची भूमिका लक्षात येते. त्यांच्या जीवनातील हा प्रसंग विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक यशाची प्रेरणा देत नाही, तर शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे आणि समाजाचे भविष्य बदलण्याचा आत्मविश्वासही देतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण सामाजिक विषमता, जातिभेद आणि अस्पृश्यतेच्या वातावरणात गेले. त्या काळात समाजातील काही घटकांना शिक्षणाच्या संधी सहज उपलब्ध होत्या; परंतु वंचित आणि उपेक्षित समाजातील मुलांना शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. अशा प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत शिक्षणाची वाट चालणे हे मोठे आव्हान होते. मात्र ज्ञानप्राप्तीची तीव्र इच्छा, कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या बळावर बाबासाहेबांनी आपले शैक्षणिक जीवन घडविले. त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरी मिळविण्याचे किंवा वैयक्तिक प्रतिष्ठा संपादन करण्याचे साधन मानले नाही, तर सामाजिक गुलामगिरी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमता यांपासून मुक्त होण्याचा मार्ग मानला. त्यांच्या जीवनातील हा विचार आजच्या विद्यार्थ्यांसाठीही तितकाच महत्त्वाचा आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी ज्ञानाच्या बळावर माणूस स्वतःचे आयुष्य बदलू शकतो, हा विश्वास विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने अधिक दृढ होणे आवश्यक आहे.

विद्यार्थी हा कोणत्याही राष्ट्राच्या भविष्याचा आधारस्तंभ असतो. आजच्या विद्यार्थ्यांच्या विचारांवर, ज्ञानावर, कौशल्यांवर आणि मूल्यांवर उद्याच्या समाजाची रचना अवलंबून असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी तयार करणे पुरेसे नाही, तर त्यांना जबाबदार नागरिक, संवेदनशील व्यक्ती आणि विवेकी समाजघटक म्हणून घडविणे आवश्यक आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, आत्मविश्वास, सामाजिक बांधिलकी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण झाली पाहिजे. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ माहिती मिळविणे नसून त्या माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे विवेकपूर्ण आचरणात रूपांतर करणे हा आहे. जेव्हा विद्यार्थी स्वतः विचार करू लागतो, प्रश्न विचारण्याचे धैर्य दाखवतो, पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढतो आणि समाजातील समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहतो, तेव्हाच शिक्षणाचे खरे फलित दिसून येते.

आजच्या काळात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, माहिती आणि संप्रेषणाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे ज्ञानप्राप्तीची साधने अधिक व्यापक झाली आहेत. पूर्वी ज्ञान मिळविण्यासाठी पुस्तके, ग्रंथालये आणि शिक्षक यांच्यावर प्रामुख्याने अवलंबून राहावे लागत होते; परंतु आज संगणक, भ्रमणध्वनी, आंतरजाल, डिजिटल ग्रंथालये आणि विविध शैक्षणिक व्यासपीठांमुळे जगभरातील ज्ञान विद्यार्थ्यांच्या हातात उपलब्ध झाले आहे. ऑनलाइन शिक्षण, आभासी वर्ग, डिजिटल अभ्याससाहित्य आणि मुक्त शैक्षणिक साधनांमुळे शिक्षणाच्या संधींचा विस्तार झाला आहे. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही ज्ञानाच्या नव्या स्रोतांपर्यंत पोहोचण्याची संधी निर्माण झाली आहे. मात्र या तंत्रज्ञानाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना समान प्रमाणात मिळतो का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक ठिकाणी इंटरनेटची अनुपलब्धता, आर्थिक अडचणी, डिजिटल साधनांचा अभाव आणि तांत्रिक साक्षरतेची कमतरता यांमुळे विद्यार्थी शैक्षणिक संधींपासून वंचित राहतात. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचा विस्तार करताना सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करण्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे.

भारतीय समाजात शिक्षणाचा प्रसार झाला असला, तरी शिक्षणाच्या समान संधींचे उद्दिष्ट अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक सुविधांमध्ये असलेली तफावत, गरीब कुटुंबांतील मुलांची आर्थिक परिस्थिती, मुलींच्या शिक्षणासमोरील सामाजिक अडथळे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा आणि आदिवासी भागातील शाळांची उपलब्धता हे प्रश्न आजही महत्त्वाचे आहेत. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची इच्छा असूनही आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वाहतुकीच्या अडचणी आणि सामाजिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते. काही विद्यार्थ्यांना बालमजुरी, बालविवाह, स्थलांतर आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी यांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे, ही जाणीव समाजात अधिक दृढ होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालक आणि सामाजिक संघटनांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

शिक्षणातील सामाजिक समतेचा विचार करताना स्त्रीशिक्षणाचे महत्त्व विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे. एखाद्या मुलीला शिक्षणाची संधी मिळणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे जीवन बदलणे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढीच्या विकासाचा मार्ग खुला करणे होय. शिक्षित स्त्री स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक होते, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करते आणि कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग घेते. मुलींच्या शिक्षणामुळे बालआरोग्य, कुटुंबाचे आरोग्य, सामाजिक जागरूकता आणि आर्थिक विकासालाही चालना मिळते. तथापि, काही भागांत आजही मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणाबाबत भेदभाव केला जातो. मुलींच्या सुरक्षिततेचे प्रश्न, लवकर विवाह, घरकामाची जबाबदारी आणि शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक तरतूद नसणे यांमुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतात. विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने प्रत्येक मुलाला आणि मुलीला समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याचा सामाजिक संकल्प करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. शिक्षक हा केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देणारा, जिज्ञासेला प्रोत्साहन देणारा आणि जीवनमूल्यांची रुजवण करणारा मार्गदर्शक असतो. शिक्षक विद्यार्थ्यांच्या क्षमतांची ओळख करून देतो, त्यांच्या अडचणी समजून घेतो आणि त्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी



प्रेरित करतो. प्रत्येक विद्यार्थी बुद्धिमत्ता, आवड, कौशल्य, शिकण्याची गती आणि सामाजिक पार्श्वभूमी या बाबतीत वेगळा असतो. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांकडून एकाच पद्धतीने आणि एकाच गतीने शिकण्याची अपेक्षा करणे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक क्षमतांचा आदर करून अध्यापनाच्या विविध पद्धतींचा वापर करणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्याला प्रोत्साहन देणे, चुका करण्याची संधी देणे आणि त्या चुकांमधून शिकण्यास मदत करणे ही आधुनिक शिक्षणपद्धतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

शिक्षणामध्ये पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांनी केवळ गुणांची अपेक्षा न ठेवता त्यांच्या आवडी, क्षमता आणि मानसिक स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा विद्यार्थ्यांवर परीक्षेत अव्वल येण्याचा, स्पर्धेत यश मिळविण्याचा किंवा विशिष्ट व्यावसायिक क्षेत्र निवडण्याचा अनावश्यक दबाव टाकला जातो. या दबावामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीती, न्यूनगंड आणि मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते आणि यशाचे स्वरूपही वेगवेगळे असू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांची इतरांशी तुलना करण्याऐवजी त्यांच्या प्रगतीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. अपयश आले तरी ते आयुष्याचा शेवट नसून नव्याने प्रयत्न करण्याची संधी आहे, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे. पालकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत आणि त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या जीवनात वाचनसंस्कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पुस्तके ही केवळ परीक्षेच्या अभ्यासाची साधने नसून ती माणसाला विचार करायला शिकविणारी, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक करणारी आणि अनुभवविश्व समृद्ध करणारी माध्यमे आहेत. नियमित वाचनामुळे भाषिक कौशल्ये विकसित होतात, शब्दसंपत्तीत भर पडते, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि चिकित्सक विचार करण्याची क्षमता वाढते. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील पुस्तकांबरोबरच साहित्य, इतिहास, समाजशास्त्र, विज्ञान, चरित्रे, आत्मचरित्रे आणि विविध ज्ञानशाखांतील ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. विशेषतः समाजपरिवर्तनासाठी कार्य केलेल्या महापुरुषांचे जीवनचरित्र वाचल्यामुळे संघर्ष, जिद्द, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी यांची प्रेरणा मिळते. ग्रंथालये ही शैक्षणिक संस्थांची ज्ञानकेंद्रे आहेत. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात समृद्ध ग्रंथालय, वाचनालय आणि विद्यार्थ्यांना मुक्तपणे वाचन करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. भ्रमणध्वनी आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या वापराच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये सखोल वाचनाची आवड निर्माण करणे ही शिक्षक आणि पालकांसमोरील महत्त्वाची जबाबदारी आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी संपादन करणे पुरेसे राहिलेले नाही. विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता, संघभावना, निर्णयक्षमता, समस्या निराकरण, सर्जनशीलता आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर ही आधुनिक काळातील महत्त्वाची कौशल्ये आहेत. शिक्षणाचा संबंध रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींशी जोडताना विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेची समज देणे आवश्यक आहे. शेती, उद्योग, सेवा, पर्यटन, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, पर्यावरण आणि सामाजिक विकास अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःची आवड आणि क्षमता ओळखून व्यवसायाची दिशा निश्चित केली पाहिजे. त्याचबरोबर बदलत्या रोजगारव्यवस्थेनुसार नवीन कौशल्ये शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी, हा उद्देश महत्त्वाचा असला तरी ते रोजगार निर्माण करणारे, समाजोपयोगी उपक्रम उभारणारे आणि आर्थिक विकासात योगदान देणारे बनले पाहिजेत.

विद्यार्थी जीवन हे केवळ शैक्षणिक अभ्यासापुरते मर्यादित नसते. खेळ, कला, साहित्य, सांस्कृतिक उपक्रम, सामाजिक कार्य आणि पर्यावरण संवर्धन यांमधील सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सर्वांगीण आकार मिळतो. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना, नेतृत्व आणि पराभव स्वीकारण्याची मानसिकता विकसित होते. सांस्कृतिक उपक्रमांमुळे विविध भाषा, परंपरा आणि कलांविषयी आदर निर्माण होतो. सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी झाल्यामुळे विद्यार्थ्यांना समाजातील वास्तव परिस्थितीची जाणीव होते. स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जलसंवर्धन, रक्तदानविषयक जनजागृती, ग्रामविकास आणि निरक्षरता निर्मूलन अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होते. शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. ज्ञान आणि सामाजिक अनुभव यांची सांगड घातल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते.

लोकशाही व्यवस्थेच्या बळकटीकरणात विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे मतदार, प्रशासक, शिक्षक, संशोधक, उद्योजक आणि लोकप्रतिनिधी असणार आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि मानवी प्रतिष्ठा ही भारतीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत. या मूल्यांचा आदर करणारा विद्यार्थीच जबाबदार नागरिक बनू शकतो. जात, धर्म, भाषा, प्रदेश, लिंग किंवा आर्थिक परिस्थिती यांच्या आधारे कोणताही भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला समान मानवी प्रतिष्ठा देण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली पाहिजे. समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून सावध राहणेही तितकेच आवश्यक आहे. कोणतीही माहिती स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विविध दृष्टिकोन समजून घेणे आणि विवेकाने मत तयार करणे ही लोकशाही नागरिकत्वाची महत्त्वाची लक्षणे आहेत.

सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षणक्षेत्रात मोठे बदल घडत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना अभ्यासातील संकल्पना समजून घेणे, माहितीचे विश्लेषण करणे, भाषांतर करणे आणि विविध विषयांवरील ज्ञान मिळविणे अधिक सुलभ झाले आहे. मात्र तंत्रज्ञानाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विचारशक्तीला दुय्यम स्थान देता कामा नये. कृत्रिम बुद्धिमत्तेने दिलेली माहिती नेहमी अचूक असेलच असे नाही. त्यामुळे तिची पडताळणी करणे, संदर्भ तपासणे आणि स्वतःच्या आकलनानुसार निष्कर्ष काढणे आवश्यक आहे. अभ्यासातील प्रामाणिकपणा, बौद्धिक संपदेचा आदर आणि माहितीच्या गोपनीयतेचे भान विद्यार्थ्यांनी जपले पाहिजे. तंत्रज्ञान हे शिक्षणाचे साधन आहे; ते शिक्षक, मानवी संवाद, अनुभव आणि स्वतंत्र विचार यांची जागा पूर्णपणे घेऊ शकत नाही. म्हणूनच तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर आणि मानवी मूल्यांचे जतन यांचा समतोल साधणे ही आजच्या विद्यार्थ्यांसमोरील महत्त्वाची गरज आहे.

विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याकडेही शिक्षणव्यवस्थेने गांभीर्याने पाहिले पाहिजे. अभ्यासाचा ताण, परीक्षेची भीती, रोजगाराबाबतची अनिश्चितता, सामाजिक तुलना आणि कौटुंबिक अपेक्षा यांमुळे अनेक विद्यार्थी मानसिक तणावाचा अनुभव घेतात. अशा वेळी त्यांना समजून घेणारे वातावरण, योग्य मार्गदर्शन आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन उपलब्ध असणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम, मैदानी खेळ, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि सकारात्मक विचारसरणी यांचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो. विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने बोलण्याची सवय लावली पाहिजे. अपयश, अडचणी किंवा वैयक्तिक समस्या लपवून ठेवण्याऐवजी शिक्षक, पालक आणि विश्वासू व्यक्तींशी संवाद साधला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या यशाचे मोजमाप केवळ परीक्षेतील गुणांवर न करता त्यांच्या आत्मविश्वास, कौशल्ये, नैतिकता, आनंद आणि सामाजिक जाणीव यांच्या आधारेही केले पाहिजे.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेचा विचार केला असता महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले कार्य विशेष महत्त्वाचे ठरते. त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. स्त्रिया, शूद्र-अतिशूद्र, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे शिक्षणाचा अधिकार हा समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या चळवळीला बळ मिळाले. या समाजसुधारकांच्या कार्याचा वारसा जपत आजच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणातील समता, सामाजिक न्याय आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. शिक्षण मिळाल्यानंतर केवळ स्वतःची प्रगती साधणे पुरेसे नसून समाजातील इतर घटकांच्या प्रगतीसाठीही योगदान देणे आवश्यक आहे. ज्ञानाचा उपयोग समाजातील विषमता कमी करण्यासाठी आणि दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी झाला पाहिजे.

आज भारतासमोर लोकसंख्येच्या दृष्टीने तरुणाईची मोठी शक्ती उपलब्ध आहे. या तरुणाईला योग्य शिक्षण, कौशल्ये, संशोधनाची संधी आणि रोजगाराभिमुख वातावरण उपलब्ध करून दिल्यास देशाच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील संशोधन, पर्यावरण संवर्धन, ग्रामीण विकास, सामाजिक समता, सार्वजनिक आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबन अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये केवळ स्पर्धेची भावना न वाढविता सहकार्य, सहिष्णुता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणेही आवश्यक आहे. देशाचा विकास हा केवळ आर्थिक समृद्धीवर अवलंबून नसून समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळण्यावरही अवलंबून आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या यशाबरोबरच समाजाच्या सामूहिक प्रगतीचाही विचार केला पाहिजे.

विद्यार्थी दिन साजरा करण्यामागील खरा हेतू केवळ औपचारिक कार्यक्रम आयोजित करणे किंवा भाषणे देणे हा नसावा. या दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आस्था, ज्ञानाविषयी जिज्ञासा, परिश्रमांविषयी निष्ठा आणि सामाजिक परिवर्तनाविषयी बांधिलकी निर्माण झाली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळाप्रवेशाच्या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करताना शिक्षणापासून वंचित राहिलेल्या प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा संकल्प केला पाहिजे. या दिवसाचे औचित्य साधून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वाचनप्रेरणा, निबंधलेखन, वक्तृत्व, चर्चासत्रे, ग्रंथप्रदर्शने आणि सामाजिक जाणीव जागृतीचे उपक्रम आयोजित केले पाहिजेत. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे व्यापक सामाजिक महत्त्व समजण्यास मदत होईल. शेवटी, शिक्षण हे व्यक्तीला केवळ साक्षर बनविणारे माध्यम नसून त्याला विवेकी, स्वाभिमानी, स्वावलंबी आणि जबाबदार नागरिक बनविणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञान मिळविण्याबरोबरच त्याचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी केला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःमधील क्षमता ओळखून परिश्रम, सातत्य आणि प्रामाणिकपणाच्या बळावर आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा आणि सर्जनशीलता विकसित करावी, पालकांनी त्यांना प्रोत्साहन द्यावे आणि शासनाने सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून द्याव्यात. शिक्षणाची दारे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत खुली झाली, तरच समताधिष्ठित आणि प्रगत समाजाची निर्मिती शक्य होईल. ७ नोव्हेंबरचा विद्यार्थी दिन हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करणारा आणि शिक्षणातून सामाजिक परिवर्तन घडविण्याची प्रेरणा देणारा दिवस ठरला पाहिजे. कारण शिक्षणाने समृद्ध झालेला विद्यार्थीच उद्याच्या सक्षम, संवेदनशील आणि प्रगत भारताचा खरा शिल्पकार ठरू शकतो.

■ **डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

संपत सायकड यांना मदतीचा हात; भानुदास परकाळे यांनाही ५० हजारांची मदत मंजूर!

■ **आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील सायकड वस्ती येथील संपत सायकड आणि घुमरी पिंपरी येथील भानुदास परकाळे; दोघांच्याही वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. विशेष म्हणजे, संपत सायकड हे नेहमीच आमदार सुरेश धस यांच्या राजकीय विरोधात राहिलेले असतानाही, त्यांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात पुढे करण्यात आला. यामुळे राजकारणापेक्षा माणुसकी मोठी असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

सायकड वस्ती येथील संपत सायकड यांच्यावर अहिल्यानगर येथील न्युरान प्लस हॉस्पिटलमध्ये मेंदूविकारावरील उपचार सुरू आहेत. उपचारांचा खर्च मोठा असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक संकट उभे राहिले होते. ही बाब माजी नगरसेवक संतोष मुरकुटे यांच्या निदर्शनास आल्यानंतर

आ. सुरेश धस यांच्या संवेदनशील भूमिकेचे दर्शन; मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दोन्ही रुग्णांना आर्थिक दिलासा

त्यांनी संपत सायकड यांना मदत मिळवून देण्याची भावना आमदार सुरेश धस यांच्याकडे व्यक्त केली. आमदार धस यांनी कोणताही राजकीय पूर्वग्रह न ठेवता मदतीच्या प्रस्तावासाठी तातडीने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, मुंबई यांच्याकडून ५ नोव्हेंबर २०२६ रोजी ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २५ हजार रुपये रुग्णालयाच्या बँक खात्यात जमा झाले असून, उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर उर्वरित रक्कम वितरित होणार आहे.

घुमरी पिंपरी (ता. आष्टी) येथील भानुदास परकाळे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठीही आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावालाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाल्याचे अधिकृत मंजुरीपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे परकाळे कुटुंबालाही उपचारांच्या खर्चासाठी मोठा आधार मिळाला आहे.

आमदार सुरेश आण्णा धस हे 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून गरजू रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या आरोग्य सहाय्यता यंत्रणेमार्फत पाठपुरावा केला जात आहे.या रुग्णांना आ.सुरेश धस यांच्या ऑफिस मधून रुग्णसेवक अमर वाळके,दत्ता हुले,विकास साळवे,विनोद वाघ,शरद रेडेकर यांनी मदत केली.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
● बीड, शनिवार, 7 नोव्हेंबर 2026
Last page

देऊळगाव घाटमध्ये वादळी ग्रामसभा: सात तास चाललेल्या मॅरेथॉन बैठकीत प्रशासनाला धरले धारेवर

■ आदिनाथ ठोंबरे देऊळगाव घाट

बीड जिल्ह्यातील देऊळगाव घाट येथे नुकतीच पार पडलेली ग्रामसभा संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरली आहे. मागील काही दिवसांपासून सोशल मीडियावर ग्रामसभा आयोजित करण्यासाठी युवकांची एक फळी सातत्याने पाठपुरावा करत होती. मात्र, प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये आणि युवकांमध्ये रोष निर्माण झाला होता. अखेर युवकांच्या तीव्र दबावामुळे ३ नोव्हेंबर २०२६ रोजी ही बहुप्रतिक्षित ग्रामसभा अखेर आयोजित करण्यात आली होती.

मागील महिनाभरापासून सोशल मीडियावर सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे या सभेविषयी संपूर्ण गावाला मोठी उत्सुकता लागली होती. अखेर ठरल्याप्रमाणे सकाळी १० वाजता सुरू झालेली ही ग्रामसभा तब्बल सायंकाळी ५ वाजेपर्यंत, म्हणजेच सलग ७ तास चालली. आजवरच्या इतिहासात कधीही न पाहिलेली ही पहिलीच अत्यंत वादळी आणि प्रदीर्घ ग्रामसभा ठरली.

विकासकामांवर आणि योजनांवरून धारेवर: सभेदरम्यान युवकांनी गावातील रस्ते, जलसिंचन, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच शेतकऱ्यांसाठीच्या विविध शासकीय योजनांमध्ये झालेल्या कथित अनियमिततेचे पुरावेच ग्रामस्थांसमोर मांडले.

प्रशासनाची उडाली दमछाक: युवकांनी विचारलेल्या एकापेक्षा एक भेदक आणि अभ्यासू प्रश्नांची समर्पक उत्तरे देताना ग्रामपंचायत प्रशासनाची अक्षरशः दमछाक झाली. आशा अनेक प्रश्नांवर समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. तब्बल सात तास चाललेल्या या चर्चेत अनेक वादळी मुद्दे आणि प्रश्न उपस्थित झाले, ज्यावर यावेळी काही महत्त्वाचे ठरावही संमत करण्यात आले.

या ग्रामसभेने ग्रामस्थांमध्ये विकासाबाबत एक नवी जाणीव निर्माण केली असून, आता या बैठकीत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर प्रशासन प्रत्यक्षात नेमकी काय कारवाई करते, याकडे संपूर्ण देऊळगाव घाटच्या नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सुशिक्षित तरुणांची 'डिजिटल' नजर: प्रशासनाची दमछाक

ग्रामपंचायतीचा निधी नेमका किती आला, आणि तो कुठे खर्च झाला, याचा हिशोब तरुणांच्या हातातील मोबाईल मध्ये एका क्लिकवर मिळत असल्यामुळे युवा वर्ग अभ्यासपूर्ण मते प्रश्न मांडत होता. युवकांनी ग्रामसभेत प्रश्नांचा असा काही पाऊस पाडला की, बाकी सगळं भिजलं; पण प्रशासनाकडून समाधानकारक उत्तराचा मात्र एक थेंबही पडला नाही!" आता प्रशासनाला यापुढे अत्यंत पारदर्शक आणि काटेकोरपणे काम करावेच लागेल हे मात्र नक्की....



फक्त विकासच... वैयक्तिक टिप्पणी नको...:-

गावाच्या विकासासाठी अभ्यासपूर्ण आणि सकारात्मक मते मांडत सुशिक्षित तरुणांनी विकासाचा खरा जागर केला, त्यांचे मनापासून अभिनंदन करायलाच हवे; कारण हेच तरुण उद्याच्या देऊळगाव घाटचे भावी आधारस्तंभ आहेत. मात्र, सोशल मीडियावर व्यक्त होताना काही वेळा विकासाच्या मुद्द्यावरून थोडे बाजूला सारून टोचणारे किंवा वैयक्तिक छटांचे सूर टाळणे गरजेचे ठरते. असा कुठलाही वैयक्तिक रोष गावाच्या सलोख्यासाठी घातक ठरू शकतो; म्हणूनच अशा कर्तबगार तरुणांकडून भविष्यात केवळ सकारात्मक आणि विधायक भूमिकेचीच अपेक्षा आहे!

मानवी हक्क अभियानाच्या वतीने साखर आयुक्त पुणे यांना ऊसतोड कामगारांच्या मागण्यासाठी निवेदन

■ तेलगाव /प्रतिनिधी

मानवी हक्क अभियान संघटनेच्या वतीने डॉ.मिलिंद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ऊसतोड कामगारांच्या प्रमुख मागण्यासाठी साखर संकुल पुणे येथे साखर आयुक्त यांना निवेदन देऊन चर्चा करण्यात आली. पुढील महत्वपूर्ण प्रमुख मागण्याचे निवेदन देण्यात आले. ऊस तोडणी मजुरास प्रति टन 800 रु. भाव देण्यात यावा व मुकादमाच्या कमिशन मध्ये 30 टक्के वाढ करण्यात यावी. मा. गोपीनाथराव मुंडे , ऊसतोडणी महामंडळाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. ऊस तोडणी गरोदर महिला ,लहान मुले यांना आरोग्याच्या सुविधा राहत्या ठिकाणी देण्यात याव्या. ऊस तोडणी कामगाराच्या मुलाच्या शिक्षणाची सोय करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावे. ऊस तोडणी कामगाराची संबंधित प्रशासनाने नोंद करून आपघात ग्रस्तांना तात्काळ मदत देण्यात यावी.

ऊसतोड कामगारांना रेशनिंगची व्यवस्था राहत्या ठिकाणी करण्यात यावी आणि कामाच्या ठिकाणी शुद्ध पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी, आणि महिलांसाठी स्वच्छताग्रह राहत्या ठिकाणी उपलब्ध करून द्यावे. ऊस तोडणी कामगारांना विविध योजनांचा लाभ देऊन त्यांना स्वावलंबी करण्यात यावे. या मागण्या निवेदनामध्ये मांडण्यात आल्या. यावेळी मानवी हक्क अभियान पुणे जिल्हाध्यक्ष साहेबराव आप्पा आवाड, मा.ह.अभियान तालुकाअध्यक्ष बाबासाहेब भाऊ थोरात, मा.ह.अभियान माजलगाव तालुकाअध्यक्ष कपिल आवाड ,समर्थ पाटोळे.. उपस्थित होते*



छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळाचा माणुसकीचा उपक्रम; गरजू कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप

■ आष्टी प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची भावना जपत छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ, आष्टी यांच्या वतीने शहरातील गरीब व गरजू कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप करून सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण करण्यात आला. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अडचणीच्या काळात आधार मिळावा, त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी हातभार लागावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उदात्त हेतूने मंडळाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येक जण आपापल्या व्यापात व्यस्त असताना समाजातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देणे ही काळाची गरज बनली आहे. अनेक कुटुंबांना दैनंदिन



जीवनातील मूलभूत गरजा पूर्ण करताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत किराणा साहित्याच्या माध्यमातून मिळालेली छोटीशी मदतदेखील त्यांच्या दृष्टीने मोठा आधार ठरू शकते. हीच जाणीव ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळाने सामाजिक उत्तरदायित्वाची भावना जपत हा उपक्रम हाती घेतला.

या सामाजिक उपक्रमासाठी गंगाधर नाना काळकुटे पाटील आणि सुनील दादा रेडेकर यांनी विशेष पुढाकार घेतला. समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद निर्माण व्हावा, तसेच समाजात परस्पर सहकार्य, आपुलकी आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

केवळ उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्याच्या माध्यमातूनही आपली बांधिलकी जपणाऱ्या मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने आपल्या परीने गरजूंच्या मदतीसाठी पुढे आल्यास अनेक कुटुंबांच्या जीवनातील अडचणी काही प्रमाणात कमी होऊ शकतात. अशा छोट्या-छोट्या मदतीतूनच सामाजिक एकोपा आणि माणुसकीचे नाते अधिक घट्ट होत असते. 'एक हात मदतीचा... माणुसकी जपण्याचा!' हा संदेश देत छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ, आष्टी यांनी राबविलेला हा उपक्रम समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारा आहे.

इंद्रनील नाईकांच्या पाठपुराव्याला यश; पुसदला मृद व जलसंधारणाचे स्वतंत्र कार्यालय..!

■ महागाव प्रतिनिधी -

पुसद तालुक्यातील मृद व जलसंधारणाच्या कामांना अधिक गती मिळावी, यासाठी स्वतंत्र उपविभागीय कार्यालय सुरू करण्याच्या मागणीला अखेर यश आले आहे. मृद व जलसंधारण विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पुसद येथे मृद व जलसंधारण विभागाचे नवीन उपविभागीय कार्यालय सुरू करण्यास महायुती सरकारने मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासन आदेश ५ नोव्हेंबर २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला.

पुसद तालुक्यात मृद व जलसंधारणाशी संबंधित विविध कामांचे वाढते प्रमाण लक्षात घेता स्वतंत्र कार्यालयाची आवश्यकता होती. या निर्णयामुळे जलसंधारण, मृदसंवर्धन, सिंचन तसेच शेतीशी संबंधित विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी स्थानिक पातळीवर अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

सध्या तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या कार्यालयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जलसाठ्यांचे संवर्धन, पाण्याचे नियोजन आणि मृदसंवर्धनाच्या कामांना स्थानिक स्तरावर गती मिळण्यास मदत होणार असून, शेतकरी व नागरिकांची प्रशासकीय कामांसाठी होणारी धावपळही कमी होणार आहे.

पुसद तालुक्याच्या दीर्घकालीन जलसुरक्षेच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय मानला जात असून, स्वतंत्र कार्यालयामुळे मृद व जलसंधारणाच्या कामांना अधिक बळ मिळून दुष्काळावर मात करण्याच्या प्रयत्नांना गती मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत सुरुडी आश्रमशाळेची देदीप्यमान कामगिरी१५ आश्रमशाळांमध्ये चुरशीची लढत; शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडीने पटकावले उपविजेतेपद

■ आष्टी (प्रतिनिधी)

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित सन २०२६-२७ च्या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत आष्टी तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सुरुडी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. वडनेर (ता. कन्नड) येथे पार पडलेल्या या स्पर्धेत सुरुडीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या स्पर्धेत प्रकल्पांतर्गत असलेल्या ८ शासकीय आणि ७ अनुदानित अशा एकूण १५ आश्रमशाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विविध मैदानी तसेच सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले. त्यामुळे संपूर्ण स्पर्धेत अत्यंत चुरशीचे सामने पाहायला मिळाले.या स्पर्धेत सुरुडी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासूनच दमदार कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांची पदके मिळवली. शिस्तबद्ध खेळ, नियमित सराव, जिद्द आणि सांघिक भावनेच्या जोरावर विद्यार्थ्यांनी गुणतालिकेत आघाडी घेत अखेर उपविजेतेपदावर आपले नाव कोरले.ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड गुणवत्ता आणि क्रीडा कौशल्य दडलेले असते.

त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते मोठे यश संपादन करू शकतात, हे सुरुडी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे.विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. राठोड, क्रीडा शिक्षक, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रकल्प कार्यालयातील अधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि क्रीडाप्रेमींनी खेळाडूंचे अभिनंदन केले. सुरुडी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे उपविजेतेपद केवळ शाळेचे यश नसून आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरले आहे.



कडा कारखाना परिसरात घरात घुसून महिला, कुटुंबीयांना मारहाण; सोन्याचे दागिने व रोकड लुटले!

■ कडा | प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा कारखाना परिसरात जमिनीच्या वादातून एका कुटुंबाच्या घरात जबरदस्तीने प्रवेश करून महिला व कुटुंबीयांना लाकडी दांडक्यांनी तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. यावेळी घरातील १० हजार ३०० रुपये रोख रक्कम, सोन्याचे दागिने हिसकावून घेतल्याचा, तर घरातील साहित्याची तोडफोड करून सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी ११ नामजद आरोपींसह ३० ते ४० अनोळखी महिलांविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कैलास संगीता जाधव (वय ४४, रा. कारखाना/जळगाव, ता. आष्टी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कडा कारखाना परिसरातील गट क्रमांक ३० मधील जमिनीवरून गेल्या वर्षभरापासून वाद सुरू आहे. या जमिनीच्या संदर्भात न्यायालयात दावा दाखल असून, यापूर्वीही संबंधितांकडून होत असलेल्या त्रासाबाबत आष्टी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास काही व्यक्तींसह ३० ते ४० अनोळखी महिला तक्रारदार यांच्या घराकडे आल्या. तक्रारदार घराचा दरवाजा बंद करीत असताना संबंधितांनी जबरदस्तीने घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील महिलांसह कुटुंबीयांना शिवीगाळ करीत लाकडी दांडक्यांनी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच घरातील सदस्यांना जबरदस्तीने बाहेर काढून मारहाण करण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

घरातील साहित्याची तोडफोड; दागिने व रोकड लंपास!

या प्रकारादरम्यान तक्रारदार यांच्या आईच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून घेण्यात आले. तसेच घरातील कपाट फोडून त्यामधील १० हजार ३०० रुपये रोख आणि सोन्याचे दागिने काढून घेतल्याचा आरोप आहे. याशिवाय घरातील सुमारे दोन लाख रुपये किमतीच्या साहित्याची तोडफोड करण्यात आली. शेजारील नागरिकांच्या घरातील साहित्याचेही नुकसान करून काही साहित्य ट्रॅक्टरमध्ये भरून नेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या मारहाणीत तक्रारदार यांच्या मुलाच्या पायाला दुखापत झाल्याचेही सांगण्यात आले आहे.

घटनेदरम्यान मारहाण थांबविण्यासाठी विनवणी करूनही संबंधितांनी दाद दिली नाही, असा आरोप तक्रारदारांनी केला आहे. अखेर त्यांनी मोबाईलवरून ११२ व १०० या आपत्कालीन क्रमांकांवर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे कडा कारखाना परिसरात खळबळ उडाली असून, संबंधित कुटुंबात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

११ जणांसह ३० ते ४० अनोळखी महिलांविरुद्ध गुन्हा

या प्रकरणी संतोष काशिनाथ गदाडे, प्रवीण दिगंबर कानडे, दीपक सिताराम कानडे, ज्ञानेश्वर काशिनाथ गदाडे, सतीश रामकिसन बनकर, संदीप साहेबराव गदाडे, शरद परमेश्वर शेंडे (सर्व रा. कडा कारखाना, जळगाव), संतोष टकले, शिवाजीराव थोरवे (रा. आष्टी), सचिन शिंदे (रा. कडा, ता. आष्टी) आणि अर्चना लोखंडे (रा. कुरुडगाव रोड, अहिल्यानगर) यांच्यासह ३० ते ४० अनोळखी महिलांविरुद्ध आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास प्रभारी प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक देविदास आवारे करीत आहेत.